सेवा प्रवेश नियम--
पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात/सेवेत/ श्रेणीत किमान सेवेसंबंधीची अट मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी शिथिल करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

CR2003092201

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक,क्रमांक:एसआरव्ही-२००३/सीआर-१८/२००३/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-२२ सप्टेंबर,२००३.

वाचा :- १) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१०८८/१०९/१२, दिनांक २५ ऑगस्ट,१९८८.
२) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०८८/१०९/ प्र.क्र.१/८८/१२,दिनांक ४ सप्टेंबर, १९९०.

परिपत्रक

वर नमूद केलेल्या शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०८८/ १०९/१२, दिनांक २५/८/१९८८ आणि शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०८८/१०९/प्र.क्र.१/८८/१२, दिनांक ४/९/१९९० अन्वये गट-क (वर्ग-३) पासून गट-अ (वर्ग-१) मधील दुसऱ्या टप्प्यावरील पदोन्नतीपर्यन्तच्या पदावर आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नत्या देताना पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून निकटतम निम्न पदावर किमान ३ वर्षाच्या सेवेची अट विहित करण्यात आलेली आहे. सध्या राज्यातील सर्व शासकीय/निम शासकीय सेवेतील मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरुन काढण्याची मोहिम हाती घेण्यात आलेली आहे. पदोन्नतीमधील अनुशेष भरुन काढण्याकरिता काही संवर्गात पदोन्नत्या देण्याकरिता निम्न संवर्गात ३ वर्षाची सेवा झालेले मागासवर्गीय कर्मचारी उपलब्ध होत नाहीत, असे शासनास आढळून आलेले आहे. त्यामुळे अनुशेष भरण्याच्या मोहिमेत बाधा उत्पन्न होत आहे. सदर बाधा दूर करण्याकरिता पदोन्नतीच्या कोटयातील मागासवर्गीयांची अनुशेषाची पदे भरण्याकरिता केवळ मागासवर्गीय कर्मचा-यांकरिता निम्न पदावरील ३ वर्षाच्या अनुभवाचा कालावधी शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. याबाबत सर्वकष विचार करुन शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, मागासवर्गीयांचा पदोन्नतीच्या कोटयातील अनुशेष भरुन काढण्याकरिता गट-क (वर्ग-३) पासून गट-अ (वर्ग-१) च्या पदावर आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर विहित केलेला सेवेचा ३ वर्षाचा कालावधी खालील अटीच्या अधीन राहून शिथिल करुन तो २ वर्षाचा करण्यात येत आहे :-

(१) त्यांची पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात राहिल व वरिष्ठ संवर्गात जेष्ठतेसाठी ग्राहय धरता येणार नाही. त्या संवर्गात वेतनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही लाभ मिळणार नाहीत.

(कृ.मा.प...

(२) अशी पदोन्नती केवळ ११ महिन्यांसाठी देण्यात यावी. त्यानंतर त्यांना पदोन्नतीमध्ये खंड देण्यात यावा.

(३) या ११ महिन्याच्या कालावधीत कनिष्ठ श्रेणीत ३ वर्षे पूर्ण झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची पदोन्नतीसाठी पात्रता पुन्हा अजमाविण्यात यावी.

३. **<u>सदर सवलत केवळ अनुशेषाची विशेष भरती मोहिम सुरु असेपर्यन्तच अनुज्ञेय राहिल.</u>**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

प्र.कृ.लोखंडे
उप सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
मा.राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
* राज्य निवडणूक आयुक्त,राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
* सचिव, अनुसूचित जमाती कल्याण समिती,विधान भवन, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, नागपूर,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा),महाराष्ट्र, नागपूर,
* महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (दोन प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन,नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती,

*पत्राने.

एच-४००(4000-9-03)1अ.

D:\Jagkar\D-12-U.SParipatrak-22-9-03